दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक १६० • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.९ सप्टेंबर २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com








पनवेल येथील पायोनिअरचा राजा नावाने प्रसिद्ध असलेल्या अभिनव युवक मित्र मंडळाची सुंदर भव्य गणेशमुर्ती. मंडळाचे यंदा ३२ वे वर्षे असून पेण येथील प्रसिद्ध मुर्तीकार किरण पाटील यांनी ही गणपती बाप्पाची सुबक मुर्ती साकारली आहे.

## पेण-हमरापूर येथे टेम्पो ट्रॅव्हलरला अपघात ; १४ गणेशभक्त जखमी

**दै.रायगड नगरी । पेण**

मुंबई गोवा महामार्गावरील पेण तालुक्यातील हमरापूर उड्डाणपुलावर झालेल्या भीषण अपघातात कोकणातील १४ गणेशभक्त जखमी झाले आहेत. त्यातील काहींना जबर दुखापत झाली असून ही अपघाताची घटना गुरुवारी पहाटे ३ च्या सुमारास घडली आहे.



सविस्तर घटना अशी कि, कोरोनाकाळातील संकटानंतर यंदाचा गणेशोत्सव उत्सा- हात उरकून मुंबईमध्ये कामानिमित्त राहणारे कोकणातील चाकरमानी गणेशभक्त मुंबईच्या दिशेने निघाले आहेत. मात्र मुसळधार पडणाऱ्या पावसात टेम्पो ट्रॅव्हलर ( क्र.MH 43 BP 0756) हा खेडवरून मुंबई सांताक्रूझच्या दिशेने जात असताना पेण तालुक्यातील हमरापूर फाट्या नजीक उड्डाणपुलावर रस्त्यात बंद पडलेल्या कॉईल घेऊन जाणाऱ्या ट्रेलर (क्र. MH 46 -R 0074 ) ला मागून धडक दिली.

या अपघातात बस मधील २२ प्रवाशांपैकी चालक सागर दिलीप गुरव ( वय ३१ ), प्रतिभा महेश देवळे (वय ३० ), रंजना दीपक भुवड

.../२




## तळोजा औद्योगिक वसाहतीमधील मोदी फार्मा कंपनीला भीषण आग

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील नवीन केमिकल झोन मध्ये असलेल्या मोदी फार्मा केमिकल कंपनीला सायंकाळी सातच्या सुमारास अचानकपणे आग लागून कंपनीचे मोठे नुकसान झाले आहे. या कंपनीमध्ये ब्रोमीन केमिकलचा साठा असल्याने आग अधिकच भडकत होती. प्रथम तळोजा अग्निशामक दलाला आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. मात्र पुन्हा केमिकल ने पेट घेतल्याने कंपनी आगीच्या भक्षस्थानी पडली आहे. मात्र कंपनी व्यवस्थापनाच्या सतर्कतेमुळे जीवित हानी मात्र टळली आहे.



तळोजा औद्योगिक क्षेत्रातील नवीन केमिकल झोन मधील प्लॉट नंबर १०३ मध्ये मोदी फार्मा केमिकल कंपनी आहे. औषध कंपन्यांना लागणारे केमिकल बनवणारी सदरची कंपनी असून यामध्ये ब्रोमिन केमिकल चा साठा असल्याचे समजते. गुरुवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास कंपनीमध्ये अचानक आग लागली. बघता बघता आगीमध्ये ब्रॉमिन केमिकल

.../२

## कौटुंबिक वादातून पत्नीच्या डोक्यात सिलेंडर टाकून हत्या

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील दुर्गम भाग असलेल्या चांदेपट्टी गावात आरोपी संजय तुकाराम दळवी याने त्याची पत्नी सुवर्णा संजय दळवी ( वय ४०) हिच्या बरोबर कौटुंबिक वाद झाला असता तिच्या डोक्यात सिलेंडर टाकल्याने पत्नीचा जागीच मृत्यू झाला. नवराच हैवान झाल्याने व तीन मुलं पोरकी झाल्याने परिसरात दुःखाचे वातावरण आहे.




गणपती उत्सवासाठी गावी आलेले या दांपत्यामध्ये काही कारणास्तव कौटुंबिक वाद झाला. वाद हळूहळू वाढत गेल्याने रागाच्या भरात हैवान झालेला पती संजय दळवी याने त्याची पत्नी सुवर्णा हिच्या डोक्यात सिलेंडर टाकला आणि त्यातच तिचा जागीच मृत्यू झाला. त्यांना दोन मुली आणि एक मुलगा आणि आई असा परिवार आहे

सदर घटनेची माहिती मिळताच पेण पोलिसांसोबत अपघातग्रस्तांचे वाली देवदूत कल्पेश ठाकूर रुग्णवाहिका घेवून घटना स्थळी तातडीने पोहचले. मात्र नेमका भांडणाचा कारण अजून पर्यंत स्पष्ट झालेलं नसून आरोपी संजय दळवी याला पेण पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सदर घटनेचा पुढील तपास पेण पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हव- ालदार तडवी, काळे, फड हे करीत आहेत.

## राज्यात अति मुसळधार पावसाची शक्यता

**दै.रायगड नगरी । पुणे**

यंदा गणेशोत्सव निर्बंध मुक्त होत आहे. आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी सगळीच गणेश मंडळ तयारी लागली आहे. मात्र यावर्षीची मिरवणुकीसह भाविकांना मुसळधार पावसात गणपती विसर्जन करावं लागणार आहे, अशी माहिती हावामान विभागाने दिली आहे. सध्या राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस पडत असल्याचे चित्र दिसत आहे. राज्यात मुंबईसह ठाणे परिसारत जोरदार पाऊस सुरू आहे. त्याचबरोबर रत्नागिरी, पुणे, सिंधुदुर्ग, सोलापूर, अहमदनगर जिल्ह्यातही



पावसानं मुसळधार हजेरी लावली आहे.

हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार येत्या ३ ते ४ दिवसांत राज्यात वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर उद्यापासून राज्यात पावसाचा जोर अधिक वाढणार आहे. नंदूरबार, धुळे, जळगाव, पालघर आणि ठाणे वगळता संपूर्ण राज्यात जोरदार ते अतिजोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचं आव- ाहन करण्यात आलं आहे. दरम्यान, राज्याच्या विविध भागात पावसानं चांगलीच हजेरी लावली आहे.

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर भीषण अपघात ; एक जण जागीच ठार

**दै.रायगड नगरी । लोणावळा**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर खंडाळा घाटातील खोपोली एक्झिट जवळील तीव्र उतारावर भीषण अपघात झाला आहे. कंटेनरचे ब्रेक निकामी झाल्यामुळे कंटेनर चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने कंटेनरने पुढे जाणाऱ्या एका इर्टिगा कारला धडक दिली आणि त्यानंतर कंटेनर मार्गाच्या कडेला उलटून अपघात झाला. या अपघातात कंटेनर चालकाचा जागीच मृत्यू झाला असून कार चालक किरकोळ जखमी झाला आहे. हा अपघात गुरुवारी दुपारी पावणे चार वाजताच्या सुमारास झाला आहे. अपघातामुळे मुंबईकडे जाणारी वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.



परशुराम कुंडलिक आंधळे (वय-२४, रा.लिंबोडीकर, आष्टी, बीड) असं अपघातात मृत्यू झालेल्या कंटेनर चालकाचं नाव आहे. बोरघाट (दस्तुरी) महामार्ग पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या कंटेनरचे (क्रमांक- एमएच-४३/वाय-५८४१) खोपोली एक्झिट जवळील तीव्र उतारावर ब्रेक निकामी झाल्यामुळे कंटेनर चालकाचे कंटेनरवरील सुटले अन् कंटेनर पुढे जाणाऱ्या इर्टिगा (क्रमांक-एमएच-४३/बीयू-२१४५) कारवर मागून जोरात धडकला. तसंच कंटेनर मार्गाच्या कडेला उलटून पलटी झाला. यावेळी कंटेनर चालकाने गाडी मधून मारली होती.परंतु तो गाडीखाली आल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. तर कार चालक किरकोळ जखमी झाला आहे. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच बोरघाट (दस्तुरी) महामार्गाचे पोलीस उपनिरीक्षक महेश चव्हाण यांनी सहकाऱ्यांसह तसंच देवदूत आपत्कालीन पथक व आयआरबीच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत घटनेची पाहणी केली. पोलिसांनी देवदूत आपत्कालीन पथक व आयआरबीच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने अपघातग्रस्त कंटेनर व कार क्रेनच्या सहाय्याने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. या घटनेचा पुढील तपास खोपोली पोलीस करत आहेत.

# मुसळधार पावसामुळे दाणादाण ; ठाणे, मुंब्रा आणि कल्याणमध्ये रस्त्यांवर पाणी साचले

**दै.रायगड नगरी । ठाणे**

मुंबई उपनगरात संध्याकाळपासून सुरु झालेल्या पावसाने प्रचंड दाणादाण उडाली आहे. ठाणे, मुंब्रा आणि कल्याण परिसरात अवघ्या काही तासांमध्ये प्रचंड पाऊस सुरु झाला आहे. त्यामुळे अनेक सखल भागांमध्ये पाणी साचले होती. मुंब्रा परिसरात मुसळधार पाऊस कोसळला. या मुसळधार पावसामुळे मुंब्रा येथे ढगफुटी सदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. रस्त्यांना आणि नाल्यांना नदीचे स्वरूप आले होते. या ढगफुटी सदृश्य पावसामुळे आर्ध्या तासात मुंब्रा शहरातील रस्ते, नाले, बाजारपेठ या ठिकाणी दोन ते तीन फूट पाणी साचलेले चित्र पाहायला मिळाले. आता पावसाचा जोर कमी झाला असून रस्त्यावरील साचेलेल पाणी कमी झाले. मुंब्रा रेल्वे स्थानकात देखील रुळावर पाणी साचले होते. या रुळावर साचलेल्या पाण्यामुळे रेल्वे लोकल सेवा विस्कळित झाली होती. संध्याकाळी ५.३० ते ते ६.३० या एका तासात ठाण्यात ७१.१२ मिमी पावसाची विक्रमी नोंद झाली आहे. कल्याणमध्ये रेल्वे ट्रॅकवर पाणी साचले होते. पावसामुळे लोकल ट्रेनचा प्रचंड खोळंबा झाला होता. मध्य रेल्वेमार्गावरील लोकल ट्रेन्स दीड ते दोन तास उशीराने धावत होत्या. सायन, कुर्ला, माटुंगा परिसरात रुळांवर पाणी साचल्याने ट्रेन अत्यंत धीम्या गतीने पुढे सरकत होत्या. त्यामुळे प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. लोकल ट्रेन उशीराने धावत असल्याने अनेक रेल्वे स्थानकांवर प्रचंड गर्दी होती. गुरुवारी संध्याकाळी चार वाजण्याच्या सुमारास ठाण्यातील आकाश काळ्या ढगांनी व्यापून टाकले. त्यानंतर विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. या पावसाचा जोर इतका आहे की, अवघ्या तासाभरात ठाण्यात ४० मिलीमीटरहून अधिक पावसाची नोंद झाली आहे. दौलत नगर परिसरात तर तासाभरात ८५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. याशिवाय, मुंबई उपनगरातील भांडुप कॉम्प्लेक्स येथे तासाभरात ७१ मिलीमीटर तर ऐरोली गावात ७४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे रेल्वे स्थानकाचा परिसर आणि इतर सखल भागांमध्ये पाणी साचले होते.



**माथेरान मध्ये सपत्नीक गणरायाचे दर्शन घेताना पत्रकार मुकुंद रांजाणे**


सर्व प्रकारच्या जाहिरातींचे उत्तम माध्यम
दैनिक रायगड नगरी
9619979706 / 9619737911


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# पनवेल येथे पाच बांगलादेशी घुसखोरांना अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील कोन येथील घरत आळीतील एका घरात बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या पाच बांगलादेशी घुसखोरांना अटक करून त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केल्याची माहिती पोलिसांनी गुरुवारी दिली.

जुली बेगम खादी मुल गाजी (वय ३७), शंपा बेगम शाहिदुल शेख (वय २५ ), नादीरा इर्शाद शेख (वय ३३), रोजीना खातून झाकीर मंडल (वय ३०) या चार महिला व सोहेल अली मोहम्मद अली शेख (वय २५ ) अशी त्यांची नावे आहेत. पनवेल परिसरातील अनेक ठिकाणी बांगलादेशी घुसखोर बेकायदेशीरपणे वास्तव्य करीत असल्यास त्यांच्याविषयी तत्काळ माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. या बांगलादेशींनी भारतात कोणत्या मार्गे प्रवेश केला, त्यांना त्याकामी कोणी आणि कशी मदत केली, ज्या घरात त्यांनी वास्तव्य केले होते, तेथे आसरा देण्यास कोणी मदत केली, भाडेकरार केला असल्यास पोलिसांचे ना हरकत प्रमाणपत्र घेतले होते का, येथे ते कोणते काम करीत होते, त्यांना कोणी रोजगार दिला याबाबचा सखोल तपास पोलीस करीत आहेत.

मे.गुन्नाल साहेब

**अर्जदारातर्फे वकील**
**हर्षदा सुनील गडकर**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्त.) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१२८४/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१९/१०/२०२२

१) रोशन जेकब जोस थरकन
S/O जोस पी. चाको
वय वर्षे : ३४, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.१०६, गणेश कृपा सी.एच.एस.,
प्लॉट नं.३६, सेक्टर नं.६, नवीन पनवेल
२) जोली जोस
W/O जोस पी. चाको
वय वर्षे : ५९, धंदा : गृहिणी
३) आशा एलिझाबेथ जोस
D/O जोस पी. चाको
वय वर्षे : २९, धंदा : नोकरी
तर्फे कुलमुखत्यारी रोशन जेकब जोस थरकन
अ.क्र.२ व ३ रा.फ्लॅट नं.३०२, बी विंग,
क्लासिक्स् सृष्टी सी.एच.एस., प्लॉट नं.३०,
सेक्टर नं.३, नवीन पनवेल (पु.), जि.रायगड अर्जदार

वरील अर्जदार क्र.१ व ३ यांनी त्यांचे वडील आणि अर्जदार क्र.२ हीने तिचे पती जोस पी. चाको यांचे मुंबई येथे दि.२३/०८/२०१८ रोजी निधन झाले. मयत जोस पी. चाको यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**फ्लॅट नं.३०२, बी विंग, तिसरा मजला, क्षेत्र ४६५ चौ.फूट बिल्टअप, क्लासिक्स सृष्टी को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.३०, सेक्टर नं.३, नवीन पनवेल (पु.), नवी मुंबई, जिल्हा : रायगड**

वरील फ्लॅट मिळकतीबाबत अर्जदार यांनी वारसचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यासह या मे.कोर्टात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांच्या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०३ माहे ०९ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मे.गुन्नाल साो

**अर्जदारातर्फे वकील ॲड.विजयेंद्र मुंढे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.२६१/२०२०
नि.नं.७/ड
ने.ता.१२/१०/२०२२

१) सौ.रचना रविंद्र राऊत
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) तृप्ती रविंद्र राऊत
वय : २२ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
३) कु.प्रज्ञेत रविंद्र राऊत
वय : १२ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
तर्फे अज्ञान पालनकर्ता आई
सौ.रचना रविंद्र राऊत
सर्व रा.प्रबोधन को.ऑप.हौ.सेसायटी, फ्लॅट नं.बी-५,
रुम नं.०१, सेक्टर ११, पनवेल, नवी मुंबई अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीशीने कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ ही कै.रविंद्र रखमाजी राऊत यांचे कायदेशीर पत्नी, अर्जदार क्र.२ ही कायदेशीर मुलगी व अर्जदार क्र.३ हा कायदेशीर मुलगा आहे. कै.रविंद्र रखमाजी राऊत यांचे निधन दि.२९/१२/२०१९ रोजी रा.पनवेल, जि.रायगड येथे त्यांच्या राहते घरी झाले. कै. रविंद्र रखमाजी राऊत यांची स्वकष्टार्जित खालील वर्णनाची मिळकती आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**प्रबोधन को.ऑप.हौ.सोसायटी, फ्लॅट नं.बी-५, रुम नं.०१, सेक्टर ११, पनवेल, नवी मुंबई**

सदरहू अर्जदार सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसच्या तारखे पासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या नोटीसीवरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयत कै.रविंद्र रखमाजी राऊत यांचे कायदेशीर वारसाचे सर्टीफिकेट देईल.

दि.०८ माहे सप्टेंबर सन २०२२

कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.श्री.सोनवणे साहेब

**अर्जदाराचे वकील**
**श्री.सन्मान पी. पाटील**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१३०३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०३/११/२०२२

१) श्रीमती.कल्पना रविंद्र ठेंगडी
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.देवत्त रविंद्र ठेंगडी
वय : २८ वर्षे, धंदा : नोकरी
३) कु.राजलक्ष्मी रविंद्र ठेंगडी
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
नं.१ ते ३ रा.५०२, बिल्डींग नं.२२,
महावीर वाटीका, प्लॉट नं.४८३/४८४,
साईनगर, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, श्री.रविंद्र प्रभाकर ठेंगडी हे दि.०४/०६/२०२१ रोजी मृत्यू पावले असून, त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

मौजे : पनवेल, ता.पनवेल येथील सर्व्हे नं.४८३ व ४८४, वरील ''महावीर वाटीका'' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या, बिल्डींग नं.२२ या इमारतीमधील, पाचव्या मजल्यामधील निवासी सदनिका (फ्लॅट) क्र.०५०२ जीचे क्षेत्र ७६१ चौ.फूट कारपेट आहे आणि ती अर्जदार क्र.१ आणि श्री.रविंद्र प्रभाकर ठेंगडी यांनी ''ॲग्रीमेंट फॉर सेल'' द्वारे खरेदी केली आहे.

अर्जदार हे कै.रविंद्र प्रभाकर ठेंगडी यांचे, कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाही. आज दि.८/०९/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्याया, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्याया, पनवेल**

## PUBLIC NOTICE

This is to inform public at large that my client Mr. Edwyn Jerry D Mello s/o Jerry D Mello, residing at Flat no. A-2701, Cosmic Heights, Bhakti Park, Wadala (E) K Type Building, Near- Imax Cinema, Mumbai-City Antop Hill, Mumbai-400037 has purchased the Plot No. 144E, situated at Sector- 26, Pusphak Wahal Node, Taluka-Panvel, Dist.-Raigad, admeasuring about 40 sq. Mtrs., from the original owner Mr. Jaywant Kashinath Madhavi. The said plot was allotted by the CIDCO to the original owner Mr. Jaywant Kashinath Madhavi, CIDCO and Executed agreement for lease in favour of him on 05/08/2022 and same registered at Jt. Sub. Registrar Panvel-2, vide document no. 11889/2022, Receipt no.- 13325 dated 24/08/2022. Mr. Jaywant Kashinath Madhavi is transferring and relinquish all his rights, tile, claims and interest of the said plot in favour of my Client Mr. Edwyn Jerry D Mello s/o Jerry D Mello by the way of Tripartite agreement. If anyone who has/ have her/ his/ their claim, right, objection, or interest in or any part of the said Plot by way of sale ,exchange, mortgage ,gift, trust, inheritance, possession, bequest, lease, lien, easement ,development or otherwise should raise his / her/ their claim within 15 (fifteen) days from the date of this Notice, failing which , it shall be presumed that the aforesaid plot of land is free from any encumbrances and charges and Mr. Edwyn Jerry D Mello s/o Jerry D Mello is the absolute owner of the property and is fully entitled to deal with the same in whatsoever manner he may desire.

**SCHEDULE OF THE PROPERTY**
**Plot No. 144E, situated at Sector- 26, Pusphak Wahal Node, Taluka-Panvel, Dist.-Raigad, admeasuring about 40 sq. Mtrs.,**

**Sd/-**
**VANDANA**
**Adv. High Court**
**610, 6th Floor, Prabhat Centre Annex, Sector-1A, CBD, Belapur Navi Mumbai-400614**
**Mob-:9820465918**

## ग्रुप ग्रामपंचायत चिखले

**ता.पनवेल, जि.रायगड सन-२०२२/२०२३** दि.०८/०९/२०२२

ग्रुप ग्रामपंचायत चिखले, ता.पनवेल, जि.रायगड हे ग्रुप ग्रामपंचायत चिखले हद्दीतील पुढील विकासकामे करणेकरिता सिलबंद निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | इसारा रक्कम १% | सुरक्षा अनामत ५% | ठेकेदाराचा वर्ग | निविदा किंमत | निविदा पाठविणेची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | **मौजे चिखले येथे गणपती विसर्जन घाटास शेड बांधणे (जिल्हा वार्षिक योजना)** | **२,९९,४४६.००** | **२९९४.००** | **१४९७२.००** | **-** | **१००.००** | **१९/०९/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत** |

१) अर्जदारांना सदर कोरे निविदा प्रपत्र दि.१२/०९/२०२२ ते १९/०९/२०२२ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होतील.
२) भरलेल्या सिलबंद निविदा दि.१९/०९/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी १२:०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
३) आलेल्या निविदा दि.१९/०९/२०२२ रोजी दुपारी ०२:०० वाजता समक्ष उघडण्यात येतील.
४) इसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट ग्रुप ग्रामपंचायत चिखले यांचे नावे असावा, अथवा रोखीने.
५) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
६) निविदा किंमत ना परतावा राहील.
७) नियमाप्रमाणे आयकर भरावा लागेल.
८) अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.
९) कामाच्या आदेशाप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.
१०) झालेल्या तांत्रिक मुल्यांकना प्रमाणे व निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.
११) मंजूर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार व पंचायत देखरेखीखाली करायचे आहे.
१२) निविदा मंजूर केल्यावर रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा.
१३) सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
१४) काम पूर्ण करणे पूर्वीच्या कामाचे ठिकाणाचे फोटो व काम चालू असतानाचे फोटो आणि काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाहीत.
१५) सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे काम करण्याचे आहे.
१६) एक किंवा सर्व निविदा / कोटेशन नामंजूर करण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

**सही/-** **ग्रामसेवक** **ग्रुप ग्रामपंचायत चिखले** **ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-** **सरपंच** **ग्रुप ग्रामपंचायत चिखले** **ता.पनवेल, जि.रायगड**

पृष्ठ क्र.१ वरुन...

# हमरापूर उड्डाणपुलावरील टेम्पो ट्रॅव्हलरच्या अपघातात १४ गणेशभक्त जखमी

(वय २५), मीनल काशिनाथ देवळे (वय २५), काशिनाथ पांडुरंग देवळे (वय ५०), सुरेश सखाराम नाचरे (वय ४०), प्रवीण काशिनाथ नाचरे ( वय ३४), मंगेश मधुकर देवळे (वय ४१), स्वप्निला काशिनाथ देवळे (वय ४७), संजना संजय पाटील (वय ३४), समृद्धी संजय पाटील (वय १४), दीपक गंगाराम भुवड (वय ३०), श्वेता सुनील भुवड (वय ३५), संजना सुरेश नाचरे (वय ३५) असे १४ प्रवासी जखमी झाले आहेत. सदर अपघाताचे वृत्त कळताच मुबई-गोवा महामार्गावरील अपघातग्रस्तांचे वाली कल्पेश ठाकूर यांनी स्वतःच्या रुग्णवाहिकेमधून सर्व अपघातग्रस्तांना पेण उपजिल्हा रुग्णालयात अधिक उपचारासाठी दाखल केले. घटनेचा अधिक तपास दादर सागरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गोविंद पाटील हे करीत आहेत.

# तळोज्यात केमिकल कंपनीला मोठी आग कंपनी भस्मसात जीवित हानी टळली

साठ्यानेही पेट घेतल्याने आगीचा वनवा भडकला. मात्र यावेळी तळोजा अग्निशामक दलाला पाचारण केल्यानंतर त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र पुन्हा कंपनीतील असलेल्या अन्य केमिकल साठ्याने पेट घेतल्याने आग पुन्हा भडकली. कंपनीमध्ये असलेल्या केमिकल साठा फटाक्या सारखा आवाज करून फुटून दहशत निर्माण करणारा होता. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र पुन्हा आगीवर नियंत्रण मिळव ण्यात तळोजा अग्निशामक दलाला यश आले. कंपनी व्यवस्थापनाच्या सतर्कतेमुळे कंपनीमध्ये मात्र मनुष्य हानी टळली आहे. आगीचे कारण मात्र समजू शकले नाही. याची सखोल चौकशी केली जाणार असल्याचे समजते. तळोजा औद्योगिक क्षेत्रात अद्याप पर्यंत अनेक वेळा कंपन्यांना आग लागण्याचे प्रकार सर्रास घडत आहेत. याबाबत कंपनी तपासणी करणारे अधिकारी व्यवस्थित कंपन्यांची तपासणी करीत नसल्याचे दिसून येत आहे. आगीचे वृत्त समजतात तळोजा पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थितीची पाहणी केली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# चिरनेर परिसरात ढगांचा गडगडाट, विजेच्या कडकडामुळे इलेक्ट्रॉनिक वस्तूंना बसला फटका




**दै.रायगड नगरी । उरण**

चिरनेर परिसरात बुधवारी (दि ७) संध्याकाळी ठिक ४-४५ च्या सुमारास अचानक आलेल्या पावसामुळे क्षणात नाल्यांना, ओढ्यांना परिस्थिती निर्माण झाली. त्यातच ढगांच्या गडगडाट आणि विजांच्या कडकडाटामुळे रहिवाशांच्या घरातील इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.चिरनेर गावातील धनाजी जाना नारंगीकर ( मधिलपाडा ) यांच्या घराजवळील पडवी पडल्याची घटना घडली आहे.त्यामुळे रहिवाशांची भंबेरी उडाली.

गेले दहा दिवस उकाड्याने त्रस्त असलेल्या उरणकराना पावसाने चांगलेच झोडपून काढले आहे.त्यात चिरनेर गाव परिसरात अचानक संध्याकाळी ठिक ४-४५ च्या सुमारास कोसळणाऱ्या पावसाने रुद्र रुप धारण केल्याने काही क्षणातच नाले, ओढे भरुन वाहू लागले. गावात पुराचे पाणी शिरणार अशी परिस्थिती निर्माण झाली असताना, ढगांच्या गडगडाट आणि विजांच्या कडकडाटात अनेक रहिवाशांच्या घरातील इलेक्ट्रॉनिक वस्तू मध्ये बिघाड झाल्याचे दिसून आले. यावेळी रहिवाशांची भंबेरी उडाली होती. तर धनाजी जाना नारंगी कर यांच्या घराजवळील पडवी पडण्याची घटना घडली. पाऊस जर अर्धा तास आणखी पडला असता तर चिरनेर गावातील अनेकांच्या घरात पूराचे पाणी शिरल्याचे संकट ओढावले असते अशी भिंती रहिवाशांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

तरी आपत्ती व्यवस्थापनाच्या अधिकारी वर्गाने संकटात सापडलेल्या चिरनेर गावातील नूकसान ग्रस्त रहिवाशांच्या घरांचे पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी नूकसान ग्रस्त रहिवाशांकडून करण्यात येत आहे.



**नगरपरिषदेच्या करसनदास वाचनालय येथील गणरायाचे दर्शन घेताना माथेरान नगरीच्या उत्तम प्रशासक मुख्याधिकारी सुरेखा भणगे (शिंदे)**

## आ.महेंद्र दळवी यांच्या निधीतून काशिद ग्रामपंचायत हद्दीतील विविध विकास कामांना मंजुरी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्रशेठ दळवी यांच्या निधीतून मुरुड तालुक्यातील काशिद ग्रामपंचायत हद्दीतील काशिद, चिकणी व सर्वे गावांसाठी विविध विकास कामांना मंजुरी मिळाल्याबद्दल शिवसेना शिंदे गटाचे उपजिल्हा प्रमुख तथा संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे तालुका अध्यक्ष भरत बेलोसे, ग्रामपंचायत उपसरपंच मयुरी धार्वे, सदस्य संतोष राणे,वर्षा विलास दिवेकर,नरेश धार्वे, हरिश्चंद्र कांगणे. सित-ाराम सारंगे. सुशिल खोपकर .विलास मोरे, अविनाश गायकर यांसह ग्रामस्थांतून आभार व समाधान व्यक्त केले जात आहे. काशिद ग्रामपंचायतीच्या विकासासाठी निधी मिळावा यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता.आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी येथील मागणी लक्षात घेऊन गावाच्या विकासासाठी काशिद बीच सुशोभीकरण करणे ८० लाख रुपये निधी, जलजीवन मिशन अंतर्गत काशिद गावातील पाईप लाईन टाकणे- २३ लाख रुपये निधी,चिकणी स्मशानभूमीच्या संरक्षण भिंतीसाठी आमदार निधीतून १० लाख रुपये निधी, चिकणी समुद्राकडे जाणा-या रस्त्यासाठी आमदार निधीतून १० लाख रुपये निधी, चिकणी आदिवासी वस्तीकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी आमदार निधीतून ५ लाख रुपये निधी, सर्वे गावासाठी जलजीवन मिशन योजने अंतर्गत पाईप लाईन टाकणे या कामासाठी ४६ लाख रुपये निधी, सर्वे गावातील अंतर्गत रस्ता तयार करणे या कामासाठी ५ लाख रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आल्याने ग्रामस्थांतून समाधान व्यक्त केले जात आहे.

## चौक गणेशोत्सवानिमित्त आरोग्य शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । चौक**

चौक कोल्हापूर पेठ येथील आदर्श मित्र मंडळ व ग्रामस्थ मंडळ गणेशोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करीत असतात.या मंडळानी अनेक सामाजिक कार्य केले असून दरवेळी या मंडळाचा सामाजिकक्षेत्रात सहभाग असतो गोरगरिबांना, पूरग्रस्तांना मदत करणे, कोरोनाग्रस्तांना तसेच इतर लोकांना अन्नधान्य वाटप करणे, रक्तदान शिबिर, नेत्र तप-ासणी शिबिर, तसेच अनेक कार्यक्रम राबविले आहेत यावर्षी या मंडळांनी गणरायाचे सुंदर अशी मूर्ती स्थापन करून परिसरात भक्तीमय वातावरण तयार केले आहे. मंडळ दरवर्षी पोलीस स्टेशन द्वारे ठेवण्यात आलेल्या पारितोषिकाचे मानकरी ठरतात. सर्वधर्मसमभाव अशी व्याख्या असून प्रत्येक कार्यकर्ता येथे जोमाने काम करण्यासाठी झटत असतो. यावेळेस श्रीपाद हॉस्पिटल मोहपाडा (नवीन पोसरी ) यांच्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन मंडळाचे कार्यकर्ते ईशान शेख यांनी केले होते. यात सर्दी, ताप,खोकला, मलेरिया, डेंग्यू,बीपी शुगर,टाचांच्या आजार, गुडघेदुखी, कंबरदुखी इत्यादी आजारांवर तपासणी करण्यात आली. साठ वर्षावरील अनेक ज्येष्ठ नागरिकांनी या संधीचा लाभ घेतला या नागरिकांचे तपासणी करून त्यांना मोफत औषध उपचार करण्यात आले. डॉ.खामकर,जयदास जाधव. तसेच हॉस्पिटलचे लेडीज स्टाफ हजर होते. यावेळी शिवसेना चौक विभाग श्री. सुधीर ठोंबरे तसेच निखिल मालुसरे,दत्ता भोईर, सुभाष पवार, दत्तात्रय दबके, तनवीर शेख, विनोद भोईर, गिरीश इंगोले तसेच सर्व सभासद उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व सभासदांनी परिश्रम घेतले.

## महिला आयोग आपल्या दारी उपक्रमांतर्गत जिल्हा नियोजन भवन येथे होणार जनसुनावणी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे कार्यालय मुंबई येथे असल्याने राज्यातील अनेक महिलांना मुंबई येथे पोहोचणे शक्य होत नाही. महिलांना त्यांच्या तक्रारीबाबत स्थानिक स्तरावर आपले म्हणणे मांडण्याकरीता महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमांतर्गत दि.१६ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले आहे. या जनसुनावणीस महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती रुपाली चाकणकर या उपस्थित राहणार आहेत.

तक्रारदार पिडीत महिलेस स्थानिक पातळीवर तात्काळ मदत व्हावी यासाठी, कोणतीही पिडीत महिला कोणतीही पूर्वसूचना न देता थेट सुनावणीस उपस्थित राहून आपली लेखी समस्या आयोगापुढे मांडू शकेल. ज्या महिलांचे प्रकरण न्यायालयात सुरु असेल अथवा न्यायप्रविष्ठ असेल, अशी प्रकरणे या जनसुना-वणीत स्विकारली जाणार नाहीत. रायगड येथील पोलीस स्टेशन आवारातील महिला समुपदेशन, सहाय्य कक्ष, भरोसा सेल तसेच महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या विभागीय कार्यालयातील रायगड जिल्ह्यांच्या तक्रारी व इतर सेवाभावी संस्थेचे समुपदेशन केंद्र यांच्याकडील प्रकरणे या जनसुनावणीत ठेवण्याच्या सूचना आयोगाकडून देण्यात आल्या आहेत.

देशातील महिला आणि बालकांच्या पोषणाची स्थिती सुधारण्याच्या उद्देशाने सन २०१८ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पोषण अभियान सुरु केले होते. पोषण अभियानात बालके, किशोवयीन, गरोदर महिला आणि स्तनदा माता यांच्यामध्ये पोषण विषयक जागरुकता आणि प्रतिसाद वाढविण्याच्या अनुषंगाने सन २०१८ पासून सप्टेंबर महिन्यात सर्व भागधारकांसोबत एकत्रितपणे राष्ट्रीय पोषण माहे म्हणून साजता केला जातो. यानुषंगाने जनसुनावणीच्या दिवशी पोषण पंचायत अंतर्गत चर्चा सत्र आयोजित करण्याचेही प्रस्तावित करण्यात आले आहे.

राज्य महिला आयोगामार्फत आयोजित या जनसुनावणीकरिता जिल्ह्यातील ग्रामीण, शहरी क्षेत्रातील समस्याग्रस्त महिलांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, तसेच अधिक माहितीसाठी परिविक्षा अधिकारी योगीराज जाधव (७७९८१७१७७७ / ९९७०१२२६२३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विनीत म्हात्रे यांनी केले आहे.

---

मा.मुजावर साहेब कोर्ट

**ॲड.विक्रम पाटील**
**अर्जदारांतर्फे वकील**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१२८१/२०२२
ने.ता.११/१०/२०२२

कै.रमेश बामा पाटील (मयत) चे वारस
१) श्रीम.शारदा रमेश पाटील
उ.व. ५२, धंदा : गृहिणी
२) श्री.विकास रमेश पाटील
उ.व. ३३, धंदा : नोकरी / व्यवसाय
३) श्री.प्रशांत रमेश पाटील
उ.व. ३१, धंदा : नोकरी / व्यवसाय
४) श्री.आकाश रमेश पाटील
उ.व. २७, धंदा : नोकरी / व्यवसाय
अनु क्र.१ ते ४ रा.पेंधर, विठ्ठल मंदिर शेजारी,
पेंधर, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ह्या जाहीर नोटीसीने सर्व जनतेस असे कळविण्यात येते की, वरील अर्जार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील कै.रमेश बामा पाटील हे सन २८/०४/२०२१ रोजी ''तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, सेक्टर-२२, नेरुळ, नवी मुंबई'' येथे मयत झाले असून त्यांच्या वडिलोपार्जित, सामाईक नावे व मालकीची खाली वर्णन केलेल्या मिळकती होत्या व आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| पेंधर/२००८ | २३२ | ४ | ०-१७-० |
| | २३२ | १ | ०-८९-० |
| | २२७ | ३ | ०-२६-६ |

कै.रमेश बामा पाटील यांची वडिलोपार्जित मिळकत त्यांचे पश्चात अर्जदार यांचे नावे व्हावी याकरिता अत्यावश्यक तो वारसदाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

सबब कै.रमेश बामा पाटील यांच्या वारसाहक्कासंबंधित अन्य कुणासही हरकत घेण्याची असल्यास अशा संबंधित व्यक्तींनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांच्या आत लेखी हरकती स्वतः अगर वकीलांमार्फत सादर कराव्यात.

सदर नोटीशीच्या मुदतीत अन्य कोणाची हरकत वगैरे न आल्यास आणि अर्जदार याने दिलेला पुरावा सिद्ध झाल्यास या अर्जदाराच्या लाभांत वारसदाखला दिला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.८/९/२०२२ रोजी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे साो

**ॲड.एन. ए. शेख**
**अर्जदारातर्फे वकील**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९५६/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२८/०९/२०२२

१) श्री.अर्जुन महादेव पाटील
वय : ७० वर्षे, धंदा : सेवानिवृत्त
रा.बि-१/४०३, बिल्डींग नं.१२२-१, भक्ती हाईट,
बि-विंग, तिलक नगर, चेंबुर, जि.मुंबई उपनगर
२) श्रीमती.वैशाली ईश्वरन् शेट्टी
वय : ५४ वर्षे, धंदा : नोकरी
रा.रुम नं.४०१, चौथा मजला, भक्ती हाईट, ए/१,
विंग लोकमान्य तिलक, टरमीनस रोड, रिलयन्स
एनर्जी जवळ, चेंबुर, मुंबई-४०००८९
३) श्री.किरण लवु शिवलकर
वय : ४७ वर्षे, धंदा : नोकरी
रा.३०३, मयुरेश सृष्टी पार्क, हिंद रेक्टिफार्स कंपनी,
लेक रोड, भांडूप, मुंबई-४०००७८ — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, कै. लक्ष्मण महादेव पाटील हे दि.२२/०९/२०२० रोजी मुंबई येथे मयत झालेले आहे. यांच्या सहमालकीची व ताबेकब्जातील व वहिवाटीतील मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे सदनिका आहे, त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | सदनिका नं. | इमारतीचे नाव | क्षेत्र | पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | फ्लॅट नं.७०२ सातवा मजला | सावन हेरिटेज कॉ.हौ. सोसायटी लि. | ५७.८ चौ.मीटर कारपेट एरिया | प्लॉट नं.२० व २१ सेक्टर १५, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड |

वरील वर्णनाची सदनिका आहे. मयत कै.लक्ष्मण महादेव पाटील यांच्या सहमालकीची व ताबेकब्जातील होती व आहे. त्यांचया मिळकतीबाबत अर्जदार यांना आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता तसेच सदरहू मिळकत अर्जदार यांच्या नावे दाखल करून घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याच्या दृष्टीने योग्य व उचित असल्याने यांनी मयताचा वारस दाखला मिळण्याकरिता मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जातील सदनिकेबाबत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत योग्य त्या पुराव्यासह स्वतः अगर आपल्या वकीलामार्फत कोर्टात उपस्थित राहून हरकत घ्यावी. वरील मुदतीत हरकती न आल्यास असे समजण्यात येईल की, वरील मिळकतीबाबत इतर कोणाचाही हक्क व हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे व सदरहू अर्जदार ना.कोर्टाकडून योग्य तो हुकूम घेतील.
दि.२५/०८/२०२२

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गुन्नाल साहेब

**अर्जदारांतर्फे वकील ॲड.सुधीर एस. म्हात्रे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१२८०/२०२२
नि.नं.८
ने.ता.१०/१०/२०२२

१) श्रीमती.सुनिता परशुराम महाडिक
रा.नडगाव तर्फे बिरवाडी, नांगलवाडी
एम.आय.डी.सी., ता.महाड, जि.रायगड ४०२३०९
२) श्री.प्रविण परशुराम महाडिक
रा.फ्लॅट नं.एल-३०४, साई डेव्हलपर्स,
साई नगर, प्लॉट नं.२६, सेक्टर नं.०४,
कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१८
३) श्री.सुनिल परशुराम महाडिक
रा.नडगाव तर्फे बिरवाडी, नांगलवाडी,
ता.महाड, जि.रायगड ४०२३०९
४) सौ.अनिता तुळशीराम बामणे लग्नाअगोदरची
अनिता परशुराम महाडिक
रा.सारंग, जि.रायगड, महाराष्ट्र ४०२३०९
४) सौ.ललिता प्रशांत गजिनकर लग्नाअगोदरची
ललिता परशुराम महाडिक
रा.ए-६/३/१४, सेक्टर नं.१०, कळंबोली, कारमेल
इंग्लिश स्कूलजवळ, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१८ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ५ यांचे वडील कै.परशुराम कोंडीराम/कोंडू महाडिक हे दि.०२/०३/२०२२ रोजी नांगलवाडी, ता.महाड, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच मयत यांची आई कै.पार्वती कोंडीराम/कोंडू महाडिक यांचा मृत्यू दि.०९/०९/१९९५ रोजी नांगलवाडी, ता.महाड, जि.रायगड येथे मयत झालेल्या आहेत. त्याअर्थी अर्जदार श्रीमती.सुनिता परशुराम महाडिक यांनी कै.परशुराम कोंडीराम/कोंडू महाडिक यांच्या खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत कै.परशुराम कोंडीराम/कोंडू महाडिक यांचे सदर अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत वारस सर्टीफिकेट मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन : फ्लॅट नं.एल-३०४, साई डेव्हलपर्स, साई नगर, प्लॉट नं.२६, ५०४ स्वे.मी. कारपेट एरिया, (बिल्टअप एरिया ५६.२० स्वे.मी.) सेक्टर नं.०४, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१० सदरहू करारनामा उरण (पनवेल-२) येथे रजिस्टर केला असून त्याचा क्रमांक उरण-००६८९-२००५ हा दि.१९/०१/२००५ रोजी रजिस्टर केलेला आहे. वरील अर्जदार हे मयत यांचे वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.परशुराम कोंडीराम/कोंडू महाडिक यांचे वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यांस वारसदाखला मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.०८/०९/२०२२ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

**अर्जदारातर्फे वकील ॲड.प्रगती रामदास म्हात्रे**

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.११३/२०१९
नि.नं.४२/ड
ने.ता.११/१०/२०२२

श्री.वसंत वासुदेव कोळी वगैरे — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात कै.वासुदेव धर्मा कोळी यंचे वारस म्हणून वारसदाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे. कै. वासुदेव धर्मा कोळी या दि.२४/०४/२०१३ रोजी मौजे हनुमान कोळीवाडा, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै. वासुदेव धर्मा कोळी यांच्या मालकीच्या व ताबेकब्जा वहिवाटीच्या मौजे : शेवे, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती सिडकोने संपादीत केल्या आहेत.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : शेवे, ता.उरण, जि.रायगड**

| गावाचे नाव/ॲवॉर्ड युनिट केस नं. | सर्व्हे नं./हिस्सा नं. |
|---|---|
| शेवे ३३७ | १४०/१ |

सदर मिळकतीच्या संपादनाच्या मोबदल्यात जेएनपीटी/ सिडको कडून १२.५ टक्के योजनेंतर्गत भूखंड मिळणार आ-हेत. सदर मिळणाऱ्या भूखंडामध्ये कै.वासुदेव धर्मा कोळी यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी कै.जोमुबाई वासुदेव कोळी ही देखील दि.१६/१०/२०१३ रोजी मयत झाली आहे. कै. वासुदेव धर्मा कोळी यांचा मुलगा कै.अनंत वासुदेव कोळी हे दि.१७/०६/२०२१ रोजी मयत झाले आहे. तसेच कै.देऊबाई उर्फ देवयानी पांडुरंग कोळी ह्या दि.१४/०२/१९९२ रोजी मयत झाली असून त्यांचे नाव कमी करून सदर भूखंडावर त्यांचे वारस अर्जदार १) श्री.वसंत वासुदेव कोळी २) श्रीती.अंजनी अनंत वासुदेव कोळी १ व २ रा.हनुमान कोळीवाडा, ता.उरण, जि.रायगड ३) श्रीमती.सुवर्णा भुपेंद्र घरत रा.जीवनमुखी स्वामी मठाजवळ, ओएनजीसी जवळ, अंबिकावाडी, नागाव, ता.उरण, जि.रायगड ४) श्रीमती.प्रिया महेंद्र मोरे रा.३७/२६४, एम.एच.बी. कॉलनी, सर्वोदय नगर, मेघवाडी जोगेश्वरी, (पु.) ४०००६० ५) श्रीमती.ललिता भरत कोळी रा.गव्हाण, खालची आळी भुतबंगला घर नं.११८, ता.पनवेल, जि.रायगड ६) श्रीमती.निलम दुश्यंत डोलघरकर पुर्वाश्रमीची श्रीमती.निलम अनंत कोळी रा.तक्का कोळीवाडा, ता.पनवेल, जि.रायगड ७) श्री.महादेव वासुदेव कोळी अर्जदार रा.हनुमान कोळीवाडा, ता.उरण, जि.रायगड ८) श्रीमती. आनंदीबाई महादेव कोळी रा.गव्हाण, राम मंदिरामागे, ता.पनवेल, जि.रायगड ९) श्रीमती.नंदा वसंत कोळी रा.हनुमान कोळीवाडा, ता.उरण, जि.रायगड १०) श्री.दिलेश पांडुरंग कोळी रा.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड हे कायदेशीर वारस आहेत. ह्या वारसांची नावे त्याच्या जागी सिडको दप्तरी रेकॉर्डवर येणे गरजेचे झाले आहे. त्याकामी दिवाणी न्यायालयाकडून वारसदाखल्याचा निवाडा जाहीर करून घेणे गरजेचे व आवश्यक झालेले आहे. सबब सदर कारणाकरिता अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालयात वारसदाखला मिळण्याकरिता सदरचा दि.चौ.अर्ज क्र.११३/२०१९ रोजी दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर मिळकतीचे वारस हक्काबाबत कोणाचीही हरकत, अधिकार अथवा वारस असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.०७/०९/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

# संक्षिप्त...

## सुधागडातील अमिषा बामणेची गरूड झेप

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील आपटवणे या छोट्याशा गावातील अमिषा बामणे हिची रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या अंडर १९ क्रिकेट टीम मध्ये निवड झाली आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द व कठोर मेहनतीच्या जोरावर आणि उत्तम प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाने अमिषाने हे यश मिळविले आहे. या यशाबद्दल तिचे पाली-सुधागड तहसीलदार दिलीप रायण्णावर यांच्या हस्ते मंगळवारी (ता.६) सन्मान करण्यात आला.

अमिषा पालीतील ग. बा. वडेर हायस्कुल व व. ग. ओसवाल कनिष्ठ महाविद्यालयामध्ये इयत्ता ११ वीत शिकत आहे. आत्तापर्यंत जिल्ह्याच्या क्रिकेट टीममध्ये निवड झालेली अमिषा ही तालुक्यातील एकमेव मुलगी आहे. अमिषाची घरची परिस्थिती बेताची आहे. वडील मंगेश वाघमारे यांचे पालीतील छोटे मोबाईल रिचार्ज व विक्रीचे दुकान आहे. आईवडील व घरातील लोकांचे सहकार्य तसेच प्रशिक्षक सतीश देशमुख यांचे बहुमूल्य मार्गदर्शन आमिषाला लाभले. क्रिकेटच्या सरावासाठी आपटवणे गावातून रोज चालत ती पालीला येते. तिच्या या कठोर परिश्रमाचे चीज झाले आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या नुकत्याच झालेल्या अंडर १९ वुमन २०-२० लीग मध्ये तीने रायगड जिल्ह्याच्या टीममधून उत्तम कामगिरी केली आहे. तिच्या या निवडीबद्दल मान्यवरांसह तालुक्यातील नागरिकांनी तिचे अभिनंदन व कौतुक केले आहे.



# गडबमध्ये विजेच्या कडकडासह ढगफुटी सदृश्य पाऊस ; गावात चिखलाचे साम्राज्य

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील गडब येथे विजेच्या कडकडाटसह ढगफुटी सदृश्य पाऊसडल्याने गावातुन जाणा-या ओढ्याचे पाणी आपली पातळी ओलांडुन गावात शिरले या मुले गावातील अनेक घरात पाणी शिरले तर अनेक वाहनांमध्ये पाणी शिरले, तर काही दुकानामध्ये व घरामध्ये पाणी शिरुन जिवनावश्यक वस्तुचे नुकसान झाले आहे तर गावात काही ठीकाणी चिखलांचे साम्राज्य पसरले आहे. तर जनजिवन विस्कळित झाले. नागरिकांचे सतर्कतेमुळे जिवित हानी झाली नाही. मात्र या ढगफुटीसदृश्य पावसामुळे जनजिवन मात्र विस्कळीत झाले.



गडब येथे बुधवारी सायंकाळी वादळी वार्यासह, विजांचा कडकडाट व ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. आभाळ फाटल्याप्रमाणे पाऊस कोसळत होता. सर्वत्र ढग दाटून आल्याने व विजबत्ती गुल झाल्याने अंधाराचे सावट पसरले. अचानक आलेल्या या पावसाने सर्वांचीच त्रेधात्रिपीट उडवली तर गडब गावाचे पुर्वेकडे असणा-या डोगंरावर जोरदार ढगफुटी सदृश्य पाऊस पडला व हे पाणी गडब गावाचे मधुन जाणा-या ओढ्यातुन सरक्षक भिंत ओलांडुन गावात शिरले अचानक या ओढ्यातुन पाण्याचा लोट आला एवढ्या जोरदार पाणी आल्याने अनेकांचे वाहनामध्ये पाणी शिरले तर घरांमध्ये पाणी शिरले तर दुकांनामध्येही पाणी शिरले मात्र नागरिकांचे सतर्कतेमुळे जिवित हानी झाली नाही.

पावसाचा जोर कमी झाल्यावर काही वेळात हे पाणी कमी झाले परंतु या पाण्या सोबत डोगंर उतारावरुन वाहुन आलेल्या मातीने गावात चिखलांचे साम्राज्य पसरले तर येथील ओढ्यावर बांधलेल्या पुलांचे काही प्रमाणात नुकसानान झाले. तर गावातील रस्तावर चिखल पसरले आहे तर काही नागरिकांचे घरात हे पुराचे पाणी शिरल्याने पाण्याच्या मोटारी, फ्रिज, वॉशिग मशिन, जिवनावश्यक वस्तु सामानाचे नुकसान झाले आहे.

# शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पालिका कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याप्रकरणी तिघांविरोधात शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पृथ्वीराज बंडू शिंगरे, क्षितिज पृथ्वीराज शिंगरे, हर्षवर्धन पृथ्वीराज शिंगरे अशी तिघांची नावे आहेत.

पोदी, नवीन पनवेल स्मशानभूमी जवळ गाढी नदी येथे गणपती विसर्जना ठिकाणी पालिकेचे कर्मचारी हजर होते. यावेळी खांदेश्वर पोलीस देखील त्या ठिकाणी होते. स्वच्छता निरीक्षक अभिजीत भवर हे त्या ठिकाणी बसले असताना गौतम जाधव हा त्यांच्याकडे आला व एक इसम कर्मचाऱ्यांशी वाद घालत असल्याचे सांगितले. यावेळी त्या इसमाने विसर्जन गेट बाहेर फटाके फोडले. तसेच त्यांनी कर्मचारी यांना गणपती विसर्जन झाल्यावर माती मागितली असता कर्मचारी यांच्या हातात माती ऐवजी दगड आला त्यामुळे त्यांनी त्या ईसमाला दगड व त्यासोबत थोडी माती दिली. यावेळी त्यांच्यात वादविवाद होऊन शिवीगाळ करण्यात आली.

अभिजीत भवर हे त्यांच्याकडे गेले असता एक इसम व त्यांच्यासोबत दोन मुले कर्मचाऱ्यांसोबत हुज्जत घालताना दिसून आले. त्यांना शांतता राखण्यासाठी सांगितले असता पालिका झाल्यापासून आम्हाला फटाके फोडू देत नाही असे बोलून दोन मुलांनी त्यांना शिवीगाळ केली. व ते अंगावर धावून आले. यावेळी त्यांच्या मदतीला गौतम जाधव व सद्दाम आला असता दोन्ही मुलांनी त्यांना हाताने मारहाण केली व एकाने कड्याने गौतम जाधव व सद्दाम याना मारहाण केली. त्यानंतर पुन्हा तिघेजण अंगावर धावून आले व भवर याना जाणीवपूर्वक धक्काबुक्की केली. या मारहाणीत गौतम जाधव व सद्दाम जखमी झाले. त्यांना उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. हा सर्व प्रकार ५ सप्टेंबर रोजी रात्री ११ ते ११:३० च्या सुमारास घडला. फटाके वाजवण्यास मनाई केली व गणपती विसर्जन केल्या ठिकाणावरून कर्मचाऱ्यांच्या हातात माती ऐवजी त्यांना दगड दिल्याने या गोष्टीचा राग येऊन तिघांनी दोघांना मारहाण केल्याप्रकरणी पृथ्वीराज बंडू शिंगरे, क्षितिज पृथ्वीराज शिंगरे, हर्षवर्धन पृथ्वीराज शिंगरे या तिघां विरोधात शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जबरी मारहाणीत मृत्यू प्रकरणी गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भांडणाचा राग मनात धरून फावड्याचा लाकडी दांडा, दगड-विटा व हाताबुक्क्यांनी केलेल्या मारहाणीत रामसिंग मोहन चव्हाण यांचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी तिघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रामसिंग व वरुण ऊर्फ अर्जुन चव्हाण यांच्यात बाचाबाची झाली होती. यावेळी विनोद चव्हाण यांनी त्यांचे भांडण सोडवले. त्यानंतर वरुण ऊर्फ अर्जुन चव्हाण व त्याचा भाऊ तरुण चव्हाण हातात फावड्याचा दांडा घेऊन व त्याच्यासोबत त्याची मानलेली बहीण लक्ष्मी किसन राठोड हे आले.

यावेळी त्यांनी रामसिंग, त्याचा भाचा व मुलगा पिंट्या यांना मारहाण केली. या मारहाणीत रामसिंग गंभीर जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी वरुण ऊर्फ अर्जुन मधुकर चव्हाण, तरुण मधुकर चव्हाण व लक्ष्मी किसन राठोड यांच्या विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला व त्यांना अटक केली आहे.

# मुंबई -गोवा महामार्गावर लाल परी पडली बंद ; प्रवाशांचे मोठ्या प्रमाणात हाल

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

कोकणवासियांचा महत्वाचा समजला जाणारा गणेशोत्सवाचा सण नुकताच उत्साहात पार पडला. अनेक चाकरमानी हे गणेशोत्सवासाठी कोकणामध्ये आले होते. गणेशोत्सव संपल्यानंतर पुन्हा एकदा अनेक चाकरमान्यांची मुंबई -ठाणे येथे परतीचा प्रवास सुरू केला आहे. काही जण रेल्वेने तर काही एसटी महामंडळाच्या बसने प्रवास करीत आहेत. परंतु सद्यपरिस्थितीत महामार्गावर एस टी महामंडळाच्या अनेक बसेस बंद पडत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्यामुळे प्रवाशांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. याचाच प्रत्यय आज गुरुवारी आला असुन महामार्गावरील कानसई गावाजवळ लाल परी बंद पडल्यामुळे प्रवाशांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.



महाड - बोरीवली ही बस महामार्गावरील कानसई गावाच्या हद्दीमध्ये आल्यानंतर बसमध्ये काहीतरी बिघाड झाल्यामुळे बस रस्त्यामध्येच बंद पडली. त्यामुळे बसमधिल प्रवाशांना दुस-या गाडीची वाट बघत बराच वेळ ताटकळत उभे राहावे लागले. त्यातच वातावरणामध्ये देखिल मोठ्या प्रमाणात उष्णता असल्यामुळे काही प्रवाशांना चक्कर देखील आली होती. तसेच मुंबई बाजुकडे जाणा-या सर्वच बसेस फुल्ल असल्यामुळे दुस-या बसची वाट बघत बसलेल्या प्रवाशांना अनेक तास ताटकळत उभे राहावे लागले. तर काहींनी दुस-या मिळेल त्या खाजगी वाहनाने प्रवास करावा लागला. त्यामुळे संतप्त प्रवाशांकडून एस टी महामंडळाच्या या भोंगल कारभाराबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नातु १० सप्टेंबरला तळा तालुक्यात

## कुडा लेणीच्या माहिती फलकाचे उदघाटन भिमराव आंबेडकर यांच्या हस्ते

**दै.रायगड नगरी । माणगाव**

भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नातु तसेच समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष व तमाम बौध्दाची मातृसंस्था भारतीय बौध्द महासभा या मातृशिखर संस्थेचे राष्ट्रीय कार्यध्यक्ष भिमराव आंबेडकर हे शनिवारी दि. १० सप्टेंबर रोजी वंदनीय भिकु संघा समवेत. विश्वाला शांतीचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुध्द यांच्याअडीज हजार वर्षा पुर्वीच्या काळातील जग प्रसिद्ध असणाऱ्या रायगड जिल्ह्यातील एकमेव अशा तळा तालुक्यातील कुडा बुध्द लेणीच्या माहीती फलकाचे अनावरन व उदघाटन करण्यासाठी येत असून त्यांच्या समवेत राष्ट्रीय महासचिव जगदिश गवई,तसेच भारतीय बौध्द महासभेचे महाराष्ट्र अध्यक्ष भिकाजी कांबळे,सरचिटणीस सुशिल वाघमारे, तसेच केंद्रीय व महाराष्ट्र राज्य संस्थेचे प्रमुख पदाधिकारी यावेळी मोठ्या सखेने उपस्थित राहाणार आहेत.



तसेच यावेळी रायगड दक्षिण जिल्ह्यातील भारतीय बौध्द महासभेचे सर्व आजी माजी पदाधिकारी कार्यकर्ते या कार्यक्रमाच्या तयारीला लागले असून या कार्यक्रमाच्या सभेला तमाम बौध्द उपासक, उपासिका केंद्रीय शिक्षक शिक्षिका, माजी श्रामणेर, बौध्दाचार्य, समता सैनिक दल यांनी ( गणवेशात )तसेच तमाम धम्मबांधव व सामाजिक, पदाधिकारी यांना देखील आव्हान करण्यात येते की, या दिवशी येत्या भाद्रपद पौर्णिमेचे अवचित्य साधून दि. १०/९/२०२२ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आपण कुडा बुध्द लेणीवर उपस्थित राहावे. तसेच विशेष सहकार्य हे लेणी संवर्धन युनिट (ए.बी.सी.पी.आर) करणार असून यावेळी भारतीय बौध्द महासभा रायगड जिल्हा दक्षिण विभाग अध्यक्ष अनिल मोरे, सरचिटणीस संतोष जाधव, कोषाध्यक्ष विजय जाधव, संस्कार उपाध्यक्ष सचिव अशोक काटे, रवीद्र पवार, पर्यटन उपाध्यक्ष सचिव मनोहर जाधव, प्रदीप साळवी, चिंतामणी मोहिते, संरक्षण उपाध्यक्ष सचिवआनंद माळी, रवीद्र गायकवाड, महिला उपाध्यक्षा सचिवा मिराताई सुरळकर, गिताताई कांबळे, अस्मिता जाधव, कार्यालयीन सचिव सुभाष ओव्हाळ, हिशेब तपासणीस चंद्रकांत गायकवाड, संघटक महादेव गव्हाणे, माणगांव तालुका शाखा अध्यक्ष प्रबुध्द जाधव, सचिव कमलाकर गंगावने, माणगांव शहर गौतम वाघमारे, वैशाली जाधव, श्रीवर्धन, प्रदीप मोहिते, संदीप जाधव, म्हसळा सुरेश जाधव, सुभाष साळवे, तळा भिमराज जाधव, प्रकाश गायकवाड, रोहा सूर्यकांत कांबळे, वसंत गायकवाड, पोलादपुर संतोष मोरे, संदीप साळवी, महाड विश्वनाथ सोनावणे, भिमराव कांबळे, हे सर्व तालुका विभाग ग्रामशाखाचे अध्यक्ष सरचिटणीस यावेळी उपस्थित राहाणार असून. रायगड जिल्ह्यातील तमाम बौध्द धम्म बांधवानी तसेच उपासक उपासीका यांनी या कार्यक्रमास सहपरिवार सह कुंडूब हजर राहावे असे आव्हान भारतीय बौध्दमहासभा रायगड दक्षिण जिल्हा अध्यक्ष अनिल मोरे यांनी केला आहे.

# धाटाव औद्योगिक वसाहतीच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रात १ लाख ८ हजारांची चोरी

**दै.रायगड नगरी । धाटाव**

रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक वसाहतीत पोलिस ठाण्या नजीकच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रात १ लाख ८ हजारांची चोरी झाली आहे. सदर याठिकाणी सुरू असलेल्या एका प्रकल्पाच्या कामासाठी आणलेले ८ पाईप अज्ञात इसमाने चोरून नेल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे.

रोहा पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार,धाटाव औद्योगिक वसाहतीच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रात एई रेशन टाकीच्या एका प्रकल्पाच्या कामासाठी आणलेले १०० एन बी चे ४८ मीटर लांबीचे २२६२ रू प्रमाणे १ लाख,८ हजार रुपये किमतीचे एकूण ८ नग कंपनीच्या पूर्व बाजूस मोकळ्या जागेतून कोणीतरी अज्ञात इसमाने गायब केले आहेत.

याबाबत प्रसाद दीपक राईज (२३) मु.वरसे ता.रोहा यांनी पोलिसात फिर्याद दिली असून गुन्हा र. नं.१६७/२०२२ भा. द. वि.कलम ३७९ अन्वये रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर घटना ही हाकेच्या अंतरावर असलेल्या धाटाव पोलीस ठाण्यानजीक घडली असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. दरम्यान घटनेची रोहा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ना.सी.जे.कुथे यांच्या समवेत सहकारी वर्ग अधिक तपास करीत आहेत.

# सामान्य नागरिक केंद्रबिंदू ठेवून सुशासन नियमावली करावी : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

सामान्य नागरिक केंद्रबिंदू ठेऊन त्यांना शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ सुलभरित्या मिळावा यासाठी सामान्यांच्या समस्या आणि शासकीय कार्यपद्धती यांची सांगड घालत सुशासन नियमावली करावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. कृषी, आरोग्य, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, आदिवासी विकास, रोजगार निर्मिती या क्षेत्रांना विशेष प्राधान्य देऊन अन्य राज्यांना हा आदर्श ठरेल अशी नियमावली तयार करावी, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सुशासन नियमावली तयार करण्याकरिता नियुक्त समितीची वर्षा निवासस्थानी बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. या समितीचे अध्यक्ष निवृत्त तत्कालीन उपलोकायुक्त सुरेश कुमार, माजी मुख्य सचिव तथा समिती सदस्य जयंतकुमार बांठिया, स्वाधीन क्षत्रिय, के. पी. बक्षी, अजितकुमार जैन, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यावेळी उपस्थित होते. शासनाच्या सेवा नागरिकांना अधिक सुलभ व पारदर्शी पद्धतीने मिळाव्यात तसेच शासन व नागरिक यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी सुशासन नियमावलीमध्ये त्याचा अतर्भाव करावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. प्रशासनाचे सुशासन होण्यासाठी सुशासन नियमावली उपयुक्त होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. प्रशासन गतिमान करतानाच माहिती आणि तंत्रज्ञानाचा अधिक प्रभावीपणे वापर करण्याची गरज आहे.शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, शेतकऱ्यांसाठी जोडधंदा, शेतीत आधुनिक तंत्रज्ञान यासाठी समितीने उपाययोजना सुचविताना त्या क्षेत्रातील तज्ज्ञांची मदत घ्यावी, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले. अतिवृष्टीमुळे कोल्हापूरसारख्या भागात पूर येतो, वातावरणीय बदलांमुळे अतिवृष्टी, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते, यासाठी शासनाकडून वेळोवेळी मदत केली जाते, मात्र अशा नैसर्गिक आपत्तींबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना करून नागरिकांना दिलासा देण्यासाठी या समितीने त्याचा सुशासन नियमावलीमध्ये समावेश करावा, अशी सूचनाही श्री. शिंदे यांनी यावेळी केली.

### खांब-पालदाड मार्गावरील समस्या

# वाढलेल्या झाडी झुडपांमुळे अपघाताचा धोका वाढला



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील खांब - पालदाड मार्गावर मोठ्या प्रमाणावर वाढलेल्या झाडी झुडपांमुळे अपघाताचा धोका मोठ्या वाढला असल्याने अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

प्रवासाच्या दृष्टीने सुरळीत परंतू तितकाच असुरक्षित समजल्या जाणाऱ्या या मार्गावर पावसामुळे वाढलेली झाडी झुडपांमुळे सद्यस्थितीत अपघाताची दाट शक्यता वर्तविली जात आहे. तालुक्यातील अंतर्गत मार्गापैकी अत्यंत महत्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या या मार्गावरील देवकान्हे ते चिल्हे-तळवली इथपर्यंत ठिकठिकाणी पडलेले लहान मोठे खड्डे, रस्त्यावर पसरलेले छोटे मोठे दगड गोटे यामुळे येथून मार्गक्रमण करताना अक्षरक्षः जीव मुठीत घेऊनच प्रवास करावा लागत आहे. त्यातच पावसामुळे येथे वाढलेल्या मोठाल्या झाडी झुडपांमुळे तर अपघाताला आयतेच निमंत्रण मिळत आहे. वाढलेली झाडी झुडपे फार मोठ्या प्रमाणावर वाढली असल्याने त्यांचा तोल जाऊन रस्त्यावर आली असल्याने समोरून येणारे वाहन जवळ आले तरी बरोबर अंदाज येत नसल्याने छोटे मोठे अपघातही घडून येत आहेत. तर दैनंदिन वाहतूक व प्रवासाचा विचार करता येथून दररोज मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ सुरू असते. तर कंपनी कामगार, शेतकरी वर्ग, पायी चालणारे व सयकलवरून प्रवास करणारे प्रवासी तसेच विद्यार्थी वर्ग यांना येथून प्रवास करताना मोठी खबरदारी घ्यावी लागत आहे.

मागील वर्षी याच सुमारास या मार्गावर ब-याचशा अपघाताच्या घटनाही घडल्या आहेत.काही ठिकाणी असलेला अरूंद रस्ता व साईडपट्टीचा अभाव असल्याने येथून मार्गक्रमण करताना फार मोठी खबरदारी घ्यावी लागत असल्याने संबंधितांनी या गंभीर समस्येकडे लवकरात लवकर लक्ष पुरवून उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे प्रवासी व स्थानिक रहिवासी नागरिकांतून बोलले जात आहे.

# शिवसेना महानगर संघटकपदी शशिकांत डोंगरे यांची नियुक्ती करण्यात आल्याने शिवसैनिकांमध्ये उत्साह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार शिवसेना नेते सुभाष देसाई यांच्या मार्गदर्शनानुसार रायगड -पनवेल जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी डॅशिंग शिवसैनिक शशिकांत डोंगरे यांची शिवसेना महानगर संघटक - पनवेल महानगर क्षेत्र म्हणून नियुक्ती करण्यात आल्याने शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे .

मुंबईच्या मा. महापौर व शिवसेना नेत्या सौ. किशोरीताई पेडणेकर यांच्या हस्ते त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले यावेळी संपर्क प्रमुख बबनदादा पाटील, सहसंपर्क प्रमुख रघुनाथ (भाई) शिंदे, जिल्हाप्रमुख शिरीष घरत, उरण जिल्हाप्रमुख मनोहरशेठ भोईर, निरीक्षक वैभव सावंत, रायगड जिल्हा समन्वयक अनिल चव्हाण, उपजिल्हाप्रमुख भरत पाटील, रामदास पाटील, विधानसभा संघटक दिपक निकम, तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, तालुका प्रमुख ज्ञानेश्वर बडे, एकनाथ म्हात्रे, विश्वास पेटकर, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, महिला आघाडीच्या उपजिल्हासंघटिका सौ. कल्पनाताई पाटील, विधानसभा संघटिका सौ. रेवतीताई सकपाळ, तालुका संघटिका सौ. अनीता डांगरकर, सौ. मेघा दमडे, युवासेना उपजिल्हा अधिकारी अवचित राऊत, विधानसभा अधिकारी पराग मोहिते तसेच सर्व उपतालुका प्रमुख, शहर प्रमुख, विभाग प्रमुख, शाखा प्रमुख, उपशाखा प्रमुख, गट प्रमुख, बूथ प्रमुख आदि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना शिवसेना महानगर संघटक - पनवेल महानगर क्षेत्राचे शशिकांत डोंगरे यांनी सांगितले की, पक्षश्रेष्टीनी जी जवाबदारी माझ्यावर टाकली आहे तिला योग्य तो न्याय देणार व पक्ष वाढीसाठी मेहनत घेणार असल्याचे त्यांनी सांगितले .



# मोटारसायकलच्या धडकेत इसम जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुंबई-पुणे हायवेवर मुंबईकडे जाणाऱ्या रोडवर ठोंबरेवाडी येथे दुचाकी चालकाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून वाहन चालवून एका इसमाला ठोकर मारली. यात संजय कदम हे जखमी झाले आहेत. अज्ञात मोटरसायकल चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विचुंबे येथील संजय कदम हे त्यांचे टीव्हीएस कंपनीची जुपिटर मोटरसायकल क्रमांक एमएच ४६ बीडब्ल्यू १८९२ वरून घरी जात होते. ते ठोंबरेवाडी जवळ आले असता पाऊस येऊ लागल्याने रस्त्याच्या बाजूला थांबून रेनकोट घालत होते. यावेळी अज्ञात मोटरसायकल वरील चालकाने त्यांना ठोकर मारली. या अपघातात त्यांचा डावा हात फ्रॅक्चर झाला आहे.